# समजपूर्वक वाचन

**संवाद**

संदर्भ :- प्रतिभेच्या प्रांतातील प्रवास
लेखक :- अशोक निरफराके

" माफ करा हं; पण येथे एखादा पोलीस दिसला का तुम्हाला? आणि आसपास कुठे पोलीस चौकी तरी आहे का?"

"चौकी तर खूपच दूर आहे आणि पोलीस कधी इकडे येताच नाही"

" असं का! मग मुकाट्याने पैशाचे पाकिट काढा पाहू!"

**प्रश्न :-**

१) पोलिसांबद्दल चौकशी कोण करत होते?
२) ही चौकशी करण्यामागे त्याचा काय हेतू होता?

वकिलसाहेबांच्या घरी त्यांच्या शेजारचा हलवाई येऊन म्हणाला. "एखाद्या कुत्र्याने जर आमच्या दुकानातले पदार्थ पळवले, तर त्याची भरपाई मला त्या कुत्र्याच्या मालकाकडून कायदेशीरपणे वसूल करता येईल का?"
"हो हो" वकीलसाहेब म्हणाले.
"हो ना ? मग तुमच्या कुत्र्याने माझ्या दुकानातली चाळीस रुपयांची आंबा बर्फी खाल्ली त्याचे पैसे द्या."
"पण माझी फी पन्नास रुपये आहे. तेव्हा अजून दहा रुपये तुम्हीच मला द्या. म्हणजे भरपाई होईल !"

प्रश्न :-

१) हलवाई वकिलसाहेबांकडे कशाबद्दल सल्ला मागत होता?
२) वकीलसाहेबांनी हलवायावर बाजू कशी उलटवली?

---

**कविता**

संदर्भ :- निवडक किशोर

पाऊस पडतो | पडतो मुसळधार
गंगेला आला पूर | दोन्ही थडी ||१||
पाऊस पडतो | गरजे पाणी पडे
आकाश जणू रडे | रात्रंदिवस ||२||
पाऊस पडतो | पडतो सारखा
सूर्य जालासे पारखा | चार दिवस ||३||
पाऊस पडतो | विजांचा चमचमाट
धरणीमात हिरवा थाट | मांडीतसे ||४||
मेघ गडगडे | कडाडते वीज
कुशीमध्ये नीज | तान्हया बाळा ||५||
झाडे झडाडती | विजा कडाडती
धरनिमाये तुझा पती | येत आहे ||६||
मेघ गरजतो | पाऊस वर्षतो
कुशीत निजतो | तान्हा बाळ ||७||
पाऊस थांबेना | राऊळी कशी जाऊ
त्रिदळ कसे वाहू | शंकराला ||८||
पाऊस थांबेना | देऊळी कशी जाऊ
बाळाला कशी नेऊ | कडेवरी ||९||
पाऊस थांबेना | पाखरे गारठली
आईच्या पदराखाली | तान्हया बाळा ||१०||
पाणी पाणी झाले | साऱ्या अंगणात
नको जाऊ तू पाण्यात | तान्हया बाळा ||११||

---

**शब्दार्थ** :- थडी - काठी, काठापर्यंत राऊळ - देऊळ
पारखा होने - दुरावणे त्रिदल (ळ) - बेलपत्र

**प्रश्न :-**

१) आकाश रडत आहे असे केव्हा वाटते?
२) पावसाळ्यात कधीकधी सूर्य पारखा का होतो?
३) धरणीने मांडलेला हिरवा थाट कोणता?
४) बाळाची आई बाळाला शेवटी काय बजावून सांगत आहे?
५) 'पाऊस' या विषयावरची तुम्हाला आवडलेली कविता शोधून लिही. व त्यावर एक चित्र काढ.

महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद
(विद्या परिषद)
इयत्ता : सातवी

---

**जाहिरात**

संदर्भ :- पालकनीती खेळघर पुणे

जो शिकेल तोच टिकेल !

आपला मुलगा किंवा मुलगी ५ वर्षे पूर्ण आहे का ? तो किंवा ती शाळेत जाते का ?

नसेल, तर आत्ताच घाई करायला हवी, तिला किंवा त्याला शाळेत घालायला हवं.

त्यासाठी वयाचा दाखला हवा.

दाखल्यासाठी आता ससूनपर्यंत जायची गरज नाही.

कर्वेनगरच्या महानगरपालिकेच्या दवाखान्याचाही दाखला शाळा प्रवेशासाठी चालतो.

सकाळी १० ते १२ या वेळात मुलाला / मुलीला दवाखान्यात घेऊन जा.

तेथे लगेच फुकट दाखला मिळेल.

दाखल्यावर डॉक्टरांची सही व शिक्का आहेना एवढे मात्र बघून घ्या.

**प्रश्न :-**

१) वयाचा दाखला कसा काढावा?
२) दाखल्यावर काय बघणे आवश्यक आहे?

---

**लेख**

लेखक :- साने गुरुजी

आपण रस्त्यावर घाण करतो, केरकचरा फेकतो; वाटेल तेथे मुले शौचास बसतात. अशा ठिकाणी लक्ष्मी कशी येईल? अशा ठिकाणी लक्ष्मी कशी राहील? आज गावास अवकळा आली आहे. लक्ष्मी गावात शिरू पाहते, परंतु ती नाकाला पदर लावते व पुन्हा माघारी जाते. गाव म्हणजे जणू उकिरडे! माणसाला याची लाज वाटली पाहिजे लक्ष्मी निर्मळ कमळातून जन्मास येते; म्हणजेच जेथे स्वच्छता आहे तेथे लक्ष्मी जन्मते हि घाण हा नरकासुर नाहीसा करा; तरच दिवाळी तुम्हांला समजली असे होईल.

**प्रश्न :-**

१) लक्ष्मी गावात का येत नाही?

२) लक्ष्मी गावात येण्यासाठी काय करायला हवे?

३) लक्ष्मी कोठे जन्मते ? कोठे राहते?

४) दिवाळीचा अर्थ आपल्याला केव्हा समजेल?

५) वरील उताऱ्याला योग्य शीर्षक लिही.

६) या उताऱ्यातील चुकीच्या गोष्टी कोणत्या? त्यावर आपण एक नागरिक म्हणून कोणकोणते उपाय करू शकतो? त्याची यादी कर.

---

**माहितीपर लेख**
संदर्भ :- पालकनीती: ऑक्टो/नोव्हें २०११

**<u>अंगणवाडी हा बालसभेचाच एक प्रकार</u>**

१९२१ मध्ये भावनगर येथे दक्षिणामूर्तीच्या टेकडीवर भारतातील पहिली बालशाळा गिजुभाई बधेकांनी सुरू केली. डॉ. मॉन्टेसरींच्या संकल्पना आणि साधनांच्या पायावर गिजुभाईंचा स्वतःचा अभ्यास सुरू झाला. इंद्रिय विकासासाठी आवश्यक अशी डॉ. मॉन्टेसरींनी शोधलेली साधनं त्यांना आतिशय उपयुक्त वाटत होती. परंतु भारतीय परिस्थितीनुसार त्यात भर घालणेही त्यांना गरजेचे वाटत होते. मणी, बांगडीच्या काचा, रांगोळ्या या मुलांच्या परिचयाच्या वस्तू शैक्षणिक साधन म्हणून वापरता येतील, खेरीज अत्यंत काटेकोरपणे बनवलेली मॉन्टेसरींची साधने देशभर सर्वत्र परवडणार नाहीत हाही विचार यामागे होता.

'संगीत' हा गिजुभाईंच्या बालशाळेचा आत्मा होता. साधनांमधल्या काही बदलांपलीकडे मॉन्टेसरींच्या मूळ विचारांशी मात्र गिजुभाई अत्यंत प्रामाणिक होते. पुढे शिक्षकप्रशिक्षण आणि बालशाळांच्या कामाच्या प्रसारासाठी त्यांनी 'मॉन्टेसरी संघा' ची स्थापना केली. 'शिक्षणपत्रिका' हे मासिकही काढले. मॉन्टेसरींच्या नावानेच त्यांनी हे काम पुढे नेल्यामुळे आजही 'मॉन्टेसरी' म्हणजेच 'बालशाळा' हे नातं पक्कं झालं.

**प्रश्न -**

१) डॉ. मॉन्टेसरी यांनी काय काम केले?
२) गिजुभाईनी भारतीय परिस्थितीनुसार मॉन्टेसरींच्या पद्धतीत काय बदल केले?
३) गिजुभाईनी कोणती तीन महत्त्वाची कामे सुरू केली?

महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद

(विद्या परिषद)

इयत्ता : सातवी

---

**भित्तिपत्रक**

हे हवं आहे का आपल्याला?

शिस्तीसाठी हिंसक शिक्षा केल्यामुळे काय परिणाम घडतो?

- घाबरटपणा
- नातेसंबंधात ताण
- व्यसनाधीनता
- आत्मविश्वास आणि आनंदी वृत्तीचा अभाव
- बेपर्वाई
- उद्धटपणा
- आक्रमकपणा
- हिंसकवृत्ती

**प्रश्न :-**

वरील यादीपैकी कोणता परिणाम झाल्यामुळे वागण्याचा पुढील प्रकार घडला?

- थोडासा राग आला तरी संजू लगेच दुसऱ्यावर हात उगारे.
- प्रिया आणि तिचे वडील यांच्यात संभाषणच होत नसे.
- एकदा खाल्ल्यानंतर रमेशला रोजच गुटखा खावासा वाटू लागला.
- प्रश्नाचे उत्तर माहित असूनही संध्या हात वर करीत नसे.

---

**व्यक्तिचित्र**

लेखक :- जी. ए. कुलकर्णी

बखर बिम्मची

एकदा बिम्मने आईला विचारले, “आई, माझं नाव बिम्म का आहे?” “ते आता बब्बीला विचारायला पाहिजे.” आई म्हणाली, “तुला तिने प्रथम पहिले, तेव्हा ती म्हणाली, ‘आई, हा बिम्म आहे’ म्हणून तुझं नाव बिम्म!”

ते पटल्याप्रमाणे बिम्मने मान हलवली. पण तो म्हणाला, “ पण मी बिम्मच आहे, हे तिला कसं समजलं ? ”

त्यावर आई म्हणाली, “हे बघ बिम्म, तू फार कामाचा माणूस आहेस, हे मला माहीत आहे. तरीपण तू त्यातल्या त्यात दहा मिनिटे वेळ काढून थांब. म्हणजे मी आत्ताच्या आत्ता धावत जाऊन ब्रह्मदेवाला विचारून येते.”

मग काही न बोलता बिम्म बाहेर आला. तो त्या नावाखेरीज अनेक नावे आपण होऊन घेत असे, आणि
त्यातील काहीतर अगदी तासतासभर टिकत. मघाशी तो आईकडे आला व म्हणाला, आई, मी रूळइंजीन आहे.” गेले काही दिवस हे इंजीन रस्त्यावर फिरत होते. पुढेमागे होत ते मध्येच शिट्टी देत असे, व तो आवाज बिम्मच्या अंगात थरथरून जात असे. रात्री ते बिम्मच्या घरासमोरच थांबत असे, व पुढच्या बाजूला त्याला लालभडक कंदील असे. इंजिनवाला कधीतरी प्यायला पाणी मागे. मग त्याला पाणी देताना आई गुळाचा खडा अगर एखादा लाडू देत असे. मग तो इंजिनवाला बिम्मला इंजिनमधून फिरवत असे, व त्याच्यासाठी उगाचच शिट्टी वाजवी. दिवसा तो लाल कंदील नुसता अडकवलेला असे. पण त्यातून पलीकडे ऊन पडे, व त्याचा लाल तुकडा इंजिनमधल्या लाकडावर पडे. त्याच्यामध्ये हात धरल्यावर बोटे ओली न होता तांबडी होत.

त्यावर आई म्हणाली होती, “आता इंजिन का? पण एक लक्षात ठेव. तू एक सोडून पाच इंजिने असलास, तरी मोठ्या रस्त्यावर जायचं नाही. नाहीतर हाडे सैल करून देईन! तुझा जो काही इंजीनपणा आहे, तो येथेच दाखवत हिंड.” मग बिम्मने थोडा विचार केला, आणि ती कल्पना सोडून दिली. मोठ्या रस्त्यावर ऐटीत जायचे नाही, तर इंजिन व्हायचे तरी कशाला?

महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद

(विद्या परिषद)

इयत्ता : सातवी

---

**प्रश्न :-**

१) रूळ इंजिनाच्या कन्दिलातून पडणाऱ्या उजेडाची बिम्मला का गंमत वाटे?

२) बब्बी - बिम्म यांचे नाते काय असेल?

३) या उताऱ्याचे लेखक कोण आहेत?

एकंदरीत आज आईचे लक्षण काही बरे दिसत नव्हते. तो बाहेर आला, आणि आरामखुर्चीत पसरला. मग त्याला ती खुर्ची म्हणजे पाळणा आहे, असे वाटू लागले. तो बसल्या बसल्याच खुर्चीच्या कापडात डोलू लागला, आणि थोड्याच वेळात झोपला.

तो जागा झाला तेव्हा बराच वेळ झाला होता. किती वाजले होते कुणास ठाऊक. पण बिम्मच्या पोटात तरी दोन बिस्किटे व एक कपभर दूध वाजले होते. परंतु अद्याप आईची हाक मात्र ऐकू आली नव्हती. आईचे आज लक्षण काही आज ठीक नव्हते हे खरे, पण त्या भरात ती दूध व बिस्किटे विसरली असेल, तर मात्र फार झाले. तो घाबरा झाला आणि खुर्चीतून उतरला, तोच आईचे शब्द ऐकू आले, "बिम्म, आटप, दूध पिऊन घे. आज संध्याकाळी लोक येणार आहेत आपल्याकडे. त्या वेळी पोटाचा नगारा वाजवू नको सगळ्यांपुढे!"

तो आत आला. त्याचे दूध बिस्किटांसह टेबलावर ठेवले होते. बब्बी आधीच तेथे होती. ती म्हणाली, "आई, आता त्याचे दूध मीच पिणार बघ. रूळ इंजिन कधी दूध पिते का?"

त्याने इंजिन कपभर दूध पीत आहे असे कधी पहिलेच नव्हते. तो म्हणाला, "आई, मी रूळइंजिन नाही." "मी आता खरा बिम्म आहे." "बरं बाबा, तू बिम्म आहेस. आता चटकन दूध पी!"

**प्रश्न :-**

१) 'मी रूळइंजिन नाही' असे बिम्म का म्हणाला ?

२) बिम्मचे वय काय असावे? तुला तसे कशावरुन वाटते?

३) 'किती वाजले होते' या विषयीचे कोणते गमतीदार वाक्य उताऱ्यात आले आहे?

महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद

(विद्या परिषद)

इयत्ता : सातवी

---

**कोडी**

लेखिका :- ज्योत्स्ना सुतावणी

'वळ' या शब्दाचा अर्थ तुम्हा सर्वांना माहीतच आहे. 'वळ' हि अक्षरे जोडीने असलेले काही शब्द ओळखायचे आहेत. 'वळ' या अक्षरांचे स्थान वेगवेगळ्या ठिकाणी असू शकते. त्यासाठी तुम्हाला सूचक माहिती दिलेली आहे. 'वळ' या अक्षरांचे स्थानही दाखविलेले आहे.

१) काखेत कळसा गावाला - .... .... सा

२) नवजात बालकाच्या डोक्यावरचे केस - जा .... ....

३) सह्याद्रीच्या पूर्वेकडील महाराष्ट्रातील एक प्रदेश - मा .... ....

४) कृष्णलीलांचे खोडयांचे वर्णन केलेला काव्य प्रकार - ग .... .... ण

५) मुंज / विवाह प्रसंगी डोक्याला बांधावयाची माळ - मुं डा .... ....

६) कलमी नसलेल्या आंब्याची एक जात - रा य .... ....

७) श्रावणमासी हर्ष मानसी --------------- दाटे चोहीकडे - हि र .... ....

८) पश्चिम दिशा याही नावाने ओळखली जाते - मा .... .... ती

९) विशिष्ट झाडांची पाने जोडून बनवलेले ताट - प त्रा .... ....

१०) एक वेलवर्गीय फळ भाजी - प ड .... ....

११) जीभ ----------- म्हणजे चुरूचुरू बोलणे, अपशब्द बोलणे - .... .... .... .... णे

१२) प्रवास, जाणे - येणे, देवघेव - द ळ ण .... .... ण

महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद

(विद्या परिषद)

इयत्ता : सातवी

---

**पत्र**

प्रति

मा. मुख्याध्यापक,

श्री राजाराम विद्यालय अमरावती.

विषय :- बालसभा अयोजन करण्याची परवानगी मिळणेबाबत

अर्जदार :- राम गणेश पवार ( वर्गनायक ७ वी)

महोदय,

सर पुढील महिन्यात तीन जानेवारी दोन हजार सोळा रोजी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांचा जन्मदिवस आहे. या निमित्त बालसभा आयोजित करावयाची आहे. यामध्ये इयत्ता पाचवी ते आठवीच्या इयत्तांमधील दोन-दोन विद्यार्थी सावित्रीबाई फुले यांच्या जीवनकार्यावर आपली मतं मांडणार आहेत. ही बालसभा इयत्ता सातवीला आयोजन करण्याची परवानगी द्यावी व या कार्यक्रमास आपण स्वतः आपल्या शिक्षकांसह उपस्थित राहिलात तर आम्हाला आणखी मार्गदर्शन मिळेल.

आपला विद्यार्थी,

रा. ग. पवार

**प्रश्न :-**

१) बालसभा आयोजनाकरीता अर्ज कोणी सादर केला ?

२) बालसभा कोणत्या दिवशी आयोजित केली जाणार आहे ?

३) बालसभेत कोणत्या इयत्ता सहभागी होणार आहेत ?

महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद

(विद्या परिषद)

इयत्ता : सातवी

---

**अनुभव**

संदर्भ :- पालकनीती : ऑक्टो/नोव्हें २०११.

लेखक :- अज्ञातमित्र

**खेलसे मेल**

२००२ मध्ये गुजरातमधील दंगलग्रस्त भागात, दंगलीनंतर तीन महिन्यांनी आम्ही आमचं काम सुरू केलं. अहमदाबादमध्ये त्यावेळी वेगवेगळ्या छावण्यांमध्ये जवळजवळ एक लाख लोक होते. आम्ही जमालपूर भागात गेलो. वृत्तपत्रं, वाहिन्यांमुळे लोक सतत आपापली दु:ख सांगायला, बोलायला सरावले होते. त्यामुळे तिथे गेल्यावर पहिले तीन दिवस लोक सारखे त्यांच्या परिस्थितीविषयी सांगत राहिले. आम्ही ' खेळ घेऊ या ' असं सुचवल्यावर 'यासारख्या फालतू गोष्टी कशाला करता' म्हणत होते. चौथ्या दिवशी मात्र एका ठिकाणी दहा मुलांना घेऊन आम्ही सरळ खेळ चालू केले. पुढच्या दहाच मिनिटात छावणीमधलं प्रत्येक मूल, केलेल्या गोलात दाटीवाटीने येऊन बसत होतं. हसत होतं. त्यांच्या पालकांचा, जमलेल्या मोठ्यांचाही ताण थोडा कमी झालेला जाणवला. एका आईनं आम्हाला म्हटलंसुद्धा " आम्ही आमच्या मुलांना तीन महिन्यांनी हसताना पाहतोय !"

**प्रश्न -**

१) अज्ञातमित्र यांच्या कोणत्या कामाबद्दल इथे माहिती दिली आहे?

२) लोकांचा आक्षेप कोणता होता?

३) खेळामुळे काय साधले असे तुम्हाला वाटते?

महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद

(विद्‌या परिषद)

इयत्ता : सातवी

---

**प्रतिसाद**

**आनंदयात्री कवी हरपला . . .**

कवी मंगेश पाडगावकर यांचे नुकतेच निधन झाले. मानवी जीवनातील प्रत्येक भावनेवर कवितेच्या माध्यमातून आपला हक्क सांगणारे कवी मंगेश पाडगावकर हे महाराष्ट्राच्या संस्कृतीमधील कवितेच्या सौंदर्याचा आणि जीवनातील तत्वज्ञानाचा मापदंड होते. निसर्ग आणि प्रेमभावना यांना त्यांच्या कवितेत प्रथम स्थान आहे.

मंगेश पाडगावकरांनी काही प्रसिद्ध गीते व कविता लिहिल्या. पाडगावकर हे मराठी साहित्याक्षेत्राला पडलेले एक चिरतरुण सोनेरी स्वप्न होते. पाडगावकरांच्या जाण्याने कवितेच्या इतिहासातील एक पर्व लुप्त झाले.

वैशाली पटवे

बीड

**प्रश्न :-**

१) सदर प्रतिक्रिया कोणत्या घटनेसंबंधी आहे?

२) कवीच्या कवितेत कोणत्या बाबींना प्रथम स्थान लाभले?

३) कवी कशाचे मापदंड होते?

४) सदर प्रतिक्रिया कोणी मांडली आहे?